# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.01.2025** **वार- रविवार**

---

**राज्यपाल**

राज्यातल्या सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी चर्चा करून सायबर सुरक्षेबाबत अल्पकालीन अभ्यासक्रम तयार केला जाईल आणि तो सगळ्या विद्यापीठात राबवला जाईल असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पुण्यात केलं. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड्स, या कार्यक्रमात ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबरचे उप महानिरीक्षक संजय शिंत्रे, क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हील टेक्नॉलॉजीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. आपल्या भाषणात राज्यपालांनी स्वामी विवेकानंद यांना जयंतीनिमित्त अभिवादन केलं. स्वामी विवेकानंदांची शिकवण तरुणांना प्रेरणा देत असल्याचं ते म्हणाले. सायबर शिक्षा फॉर सायबर सेक्युरिटी उपक्रमात उत्कृष्ट काम करणाऱ्यांना यावेळी सन्मानित करण्यात आलं.

**जयंती**

उठा, जागृत व्हा आणि ध्येय साध्य केल्याशिवाय थांबू नका, असा मौलिक विचार युवा पिढीला देणारे थोर तत्वज्ञ स्वामी विवेकानंद यांची जयंती आज देशभरात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी केली जात आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना स्वराज्याचा मूलमंत्र देणाऱ्या राजमाता जिजाऊ मा साहेब यांचीही आज जयंती आहे. या निमित्त पुण्यात विविध संस्थांच्या वतीनं आज स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करण्यात आलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सातारा इथल्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून पुणे ते सातारा 125 किलोमीटर 'दौड' चं आयोजन करण्यात आलं. आज पहाटे फर्ग्युसन महाविद्यालयातून याची सुरुवात करण्यात आली.

स्वामी विवेकानंद आणि महर्षि विनोद यांच्या जयंती निमित्त आज पुण्यात महाध्यान शिबिराचं आयोजन केलं होतं. दैनंदिन जीवनात मानसिक ताण तणावांचं नियोजन करण्यासाठी ध्यान, या विषयावर या शिबिरात मार्गदर्शन करण्यात आलं.

**एचएमपीव्ही**

एचएमपीव्हीच्या संशयित रुग्णांच्या नमुन्यांची तपासणी आतापर्यंत पुण्यातल्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेतच होत होती. परंतु, आता ही तपासणी मुंबईच्या कस्तुरबा संसर्गरोग रुग्णालयात आणि नागपूरच्या एम्समध्ये देखील होणार आहे. त्यांचं जनुकीय क्रमनिर्धारण देखील या प्रयोगशाळांमध्ये केलं जाणार आहे.

याबाबतचे आदेश राज्याच्या आरोग्य विभागानं दिले आहेत. राज्यातल्या या तीनही प्रयोगशाळांमध्ये गंभीर श्वसनाचे आजार, हंगामी विषाणू, कोरोना यासारख्या विषाणूंच्या चाचण्या आधी केल्या जातील; या सर्व चाचणी नकारात्मक आल्यानंतर पुढे

त्याच नमुन्यांची चाचणी ‘एचएमपीव्ही’ साठी केली जाणार आहे. एचएमपीव्हीची लागण झालेल्या नमुन्यांचं जनुकीय क्रमनिर्धारण केलं जाणार आहे.

**<u>पिंक-ई-रिक्षा</u>**

महिलांना रिक्षा व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणारी पिंक ई-रिक्षा योजना राज्य सरकारनं सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पुणे महापालिकेला आतापर्यंत १३५ अर्ज आले असल्याची माहिती महापालिका उपायुक्त आणि समाज विकास विभागाचे प्रमुख नितीन उदास यांनी दिली. लाभार्थी महिलांना वाहन चालवण्याचं प्रशिक्षण आणि परवानाही दिला जाईल असं उदास यांनी सांगितलं.

**<u>घनकचरा</u>**

सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचे नियम न पाळणाऱ्या नागरिकांवर पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीनं दंडात्मक कारवाई केली जाते. या कारवाईसाठी महापालिकेच्या भरारी पथकाकडे आधी 8 वाहनं होती, या पथकाला आणखी दहा गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**<u>जेजुरीगड</u>**

शाकंभरी पौर्णिमेनिमित्त जेजुरी गडावर भाज्यांची आरास करण्यात आली आहे. यासाठी विविध प्रकारच्या सुमारे 300 किलो भाज्या वापरण्यात आल्या. त्याचा प्रसाद भाविकांमध्ये वाटला जाणार आहे.

**<u>बाजारसमिती</u>**

पुण्यातल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज हंगामातला पहिला आंबा दाखल झाला. देवगड जातीच्या सव्वा पाच डझनाच्या हापूस आंब्याच्या पेटीला 31 हजार रुपयांचा भाव मिळाला. यंदा पाऊस चांगला झाल्याने आंब्याच्या मुख्य हंगामाला 15 मार्च पासून सुरुवात होईल अशी माहिती बाजार पेठेतले आंब्याचे व्यापारी अनिरुद्ध भोसले यांनी दिली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज 15 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस किमान तापमान नोंदवलं गेलं. उद्या किमान 16 अंश तर कमाल 30 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**